## *राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक*

(पिनॅकल मॉल, ४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले द्वितीय अपील**

**क्र. रामाआ-नाशिक/द्वितीय अपील क्रमांक:- २८७०/२०१८/अहमदनगर**

१ श्री. विनायक रंगनाथ इधाटे : अपिलार्थी
मु. पो. कोरेगव्हाण,
ता. श्रीगोंदा, जि. अहमदनगर.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
मंडळ कृषि अधिकारी,
कोळगांव, ता. श्रीगोंदा, जि. अहमदनगर.

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
तालुका कृषि अधिकारी,
श्रीगोंदा, ता. श्रीगोंदा, जि. अहमदनगर.

**ऑनलाईन सुनावणी दिनांक २६/१०/२०२०**

अपिलार्थी यांनी दिनांक १८/०५/२०१८ रोजीच्या अर्जान्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे. त्यामध्ये दिनांक २६/१०/२०२० रोजी ऑनलाईन meet.google.com/ या गुगल मिट कोडद्वारे आयोजित सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित होते. विद्यमान जन माहिती अधिकारी उपस्थित होते. विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित होते.

अपिलार्थी यांनी द्वितीय अपील अर्जात नमूद केले आहे की, त्यांच्या दिनांक ०४/०४/२०१७ रोजीच्या माहिती अर्जास अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी अपुर्ण माहिती पुरविली. त्यामुळे प्रस्तुत द्वितीय अपील दाखल करावे लागले.

सुनावणीदरम्यान विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की, अपिलार्थी यांनी दिनांक ०४/०४/२०१७ रोजीच्या माहिती अर्जान्वये दिनांक ३१/१२/२०१५ ते दिनांक ०४/०४/२०१७ या कालावधीतील कंपार्टमेंट वंडीग कामातील एकुण निधी किती? काम किती मिटर झाले, शासन नियमानुसार १ मिटरचा खर्च किती ? मशिन खर्च किती ? मजुर खर्च किती ? मंजुर निधीची यादी मिळावी या कामा मध्ये

शासन हेतु किती टक्के साध्य झाला? पाझर तलावात समतोल बांध टाकण्याचा हेतु काय ? सदर काम कोणत्या गट नंबर मध्ये करण्यात आले गट नंबर नुसार खर्चाची माहिती मिळावी, आंबा, लिंबु, सिताफळ, डाळींब इत्यादी फळबागांची कोणकोणत्या शेतकऱ्यांनी लागवड केली व ती लागवड शासन नियमानुसार करण्यात आली का? आंबा लागवड (EGS का MRGS) कोणत्या प्रकारे करण्यात आली लागवडीची प्रत्यक्ष पहाणी केली का? सिताफळ लागवड केलेले गट नंबर, मजुर यादी मिळावी सोबत सिताफळ बियांचा फोटो जोडला आहे, दगडी बंधारे (अंडरस्टक्चर) मंजुर किती, पुर्ण केले किती, प्रत्येकी निधी किती मजुर यादी, मजुरांची रोजंदारी किती? ट्रॅक्टर खरपाड, कजाळी, कशावर किती खर्च झाला, भुईमुगीच्या बियाण्यासाठी मंडल अधिकारी नियम सांगतात तर वरील कामासाठी नियम अटी आहेत किंवा नाही? मंडल अधिकाऱ्याच्या नियंत्रणाखाली कोणकोणती कामे केली जातात मंडल अधिकाऱ्याची जबाबदारी काय? याबाबत माहिती मागितली होती.

त्यास अनुसरुन सदर माहिती विस्तृत स्वरुपाची असल्याने तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती पुरविली नाही. तद्नंतर अपिलार्थी यांनी दिनांक १५/०५/२०१७ अन्वये प्रथम अपील दाखल केले.

सुनावणीदरम्यान विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सांगितले की, अपिलार्थी यांनी दिनांक १५/०५/२०१७ अन्वये दाखल केलेल्या प्रथम अपिलावर तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १६/०६/२०१७ रोजी निर्णय पारित करुन अपिलार्थीस त्यांनी मागितलेली माहिती दिनांक ३०/०६/२०१७ पर्यंत तयार ठेवून उपलब्ध करुन देण्याचे निर्देश तत्कालीन जन माहिती अधिकारी यांना देण्यात येऊन प्रथम अपील निकाली काढले.

त्यानुसार तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक २९/०६/२०१७ रोजीच्या पत्रान्वये माहिती अधिकार अधिनियम, २००५ अन्वये मौजे कोरेगव्हाण येथे जलयुक्त शिवर योजना व महात्मा गांधी राष्ट्रीय फलोत्पादन अंतर्गत फळबाग लागवड इत्यादी बाबतची माहिती मंडळ कृषि अधिकारी कोळगांव, ता. श्रीगोंदा, जि. अहमदनगर यांनी माहिती पुरविली.

सुनावणीदरम्यानचा युक्तिवाद व आयोगास सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता असे दिसून आले की, अपिलार्थी यांच्या दिनांक ०४/०४/२०१७ रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरुन तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीस प्रथम अपिल निर्णयानंतर कार्यालयातील उपलब्ध माहिती तसेच वस्तुस्थितीदर्शक उत्तर पुरविल्याचे स्पष्ट होते. यावरुन तत्कालीन जन माहिती

अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती पुरविण्यास हेतुपुरस्सर टाळाटाळ केल्याचे दिसून येत नाही, ही बाब विचारात घेता अपील निकाली काढण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे. त्यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी केलेली कार्यवाही योग्य असून प्रस्तुत अपिलात काही तथ्य नाही.

सबब, या प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

प्रस्तुत द्वितीय अपील क्रमांक २८७०/२०१८/अहमदनगर निकाली काढण्यात येत आहे.

(के. एल. बिश्नोई)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ नाशिक